| MHSN110008802023 | नियमित दिवाणी दावा क्र.२११/२०२३<br>सोपान सोहनी / रघुनाथ सोहनी |
|---|---|

## निशाणी १८ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिदाव्यातील वादी यांच्यामार्फत प्रतिवादी क्र.३ हे मयत झाल्याने त्यांच्याबाबत दावा अवसान पावल्याने तसे रद्दबातल करुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी असे नमूद केले आहे की, मयत प्रतिवादी क्र.३ यांच्या वारसांना मूळ दाव्यातील वादी यांनी वेळेत अभिलेखावर आणलेले नाही. त्यामुळे प्रतिदाव्यातील वादी यांना मयताचे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब झालेला आहे. प्रतिदाव्यातील वादी यांनी मयत प्रतिवादी यांचे वारस अभिलेखावर घेण्यास जाणूनबुजून विलंब केलेला नाही. त्यामुळे, प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.३ मयत झाल्याने त्यांच्याबाबत दावा अवसान पावल्याने तसे रद्दबातल करुन मिळावे यासाठी प्रस्तुतचा अर्ज देण्यात आलेला आहे.

३. मूळ दाव्यातील वादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे देवून अर्ज फेटाळण्यात यावा असे नमूद केलेले आहे.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले. उभय पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.३ मयत झाल्याने

त्यांच्याबाबत दावा अवसान पावला आहे. प्रस्तुतचा दावा हा हक्कस्थापना व निरंतर मनाईसाठी दाखल करण्यात आलेला आहे. अशा प्रकारच्या दाव्यात मयत प्रतिवादी यांचे वारस अभिलेवर असणे दाव्याच्या अंतिम निराकरणासाठी आवश्यक आहे. असे न केल्यास विनाकारण गुंतागुंत वाढून प्रकरणांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे, सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिदाव्यातील मयत प्रतिवादी क्र.३ यांचेबाबत दाव्याचे झालेले अवसान रद्दबातल करण्यात येते.

ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2025.10.08 15:50:41 +0530

आटपाडी. (अ. जो. बाचुळकर)

दिनांक : ०८/१०/२०२५ दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

आटपाडी

*****

**CERTIFICATE**

I affirm that the, contents of this P.D.F. file order are same word to word, as per the original order -

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Mr. Ketan Ashok Sargar, (Grade-III) |
| Court | : | Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C., Atpadi |
| Date | : | 08/10/2025 |
| Order signed by the Presiding Officer | : | 08/10/2025 |
| Order uploaded on | : | 08/10/2025 |